# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पवित्र तास - शुक्रवार ०७ जून २०२४

**सुरूवातीचे गायन ः** भजतो तुला भक्तीने ...... (वसुंधरे गा - पान क्र. २५४)

*शांतता*

आजच्या ह्या मंगल समयी पवित्र साक्रामेंतासमोर प्रभूचा गौरव व स्तुती आराधना तसेच त्याच्या सहवासात मनन-चिंतन करण्यासाठी आपण एकत्र जमलो आहोत. आपण आपले मन एकाग्र करून प्रभूची उपस्थिती आपल्यामध्ये आहे ह्याची जाणीव आपल्याला अंतःकरणापासून व्हावी म्हणून आपल्या अंतःकरणाची-हृदयाची कवाडे ख्रिस्तप्रभूसाठी उघडी करू या व ह्या पवित्र भक्ती आराधनेत आपले मन रमवू या.

*शांतता*

आज आपल्या धर्मग्रामात विशिष्ट हेतूने आपण ख्रिस्ताची आराधना करत असताना प्रभूच्या कृपादानांबद्दल आपण मनापासून त्याचे आभार मानू या. काही क्षण शांत राहून प्रभू येशूच्या प्रेमाचा, त्याच्या गोड सहवासाचा, त्याच्या आरोग्यदायी स्पर्शाचा अनुभव घेऊ या.

*शांतता*

प्रभू येशू क्षमेचा उगम आहे. त्याने आपल्या मारेक-यांना क्षमा केली. बापा, त्यांना क्षमा कर कारण ते काय करतात हे त्यांना कळत नाही. तसेच उजव्या हातावरील चोराला क्षमा करून प्रभू त्याला म्हणाला, मी तुला खचित सांगतो, तू आज माझ्याबरोबर सुखलोकात असशील. आपण देखील आपल्या पापांची आठवण करून पश्चात्तापी अंतःकरणाने प्रभू येशूकडे क्षमा मागू या.

**दयायाचना ः**

१. हे प्रभू येशू, तू सर्वसमर्थ परमेश्वर तसेच राजपूत्र आहेस
   सर्व ः करूणा कर प्रभू आम्हावरी
२. हे प्रभू येशू, तू दुर्बलांना व पाप्यांना क्षमा करतोस
   सर्व ः करूणा कर ख्रिस्ता आम्हावरी
३. हे प्रभू येशू, तू अंधारात चालणा-यांना प्रकाश दाखवतोस
   सर्व ः करूणा कर प्रभू आम्हावरी

*शांतता*

## प्रभूशब्द

प्रभूचा शब्द आपला आनंद, प्रकाश, जीवन व सर्वस्व आहे. तो आपल्या जीवनाला सतत उभारी देतो, चालना देतो, अडचणीतून तो आपल्याला मार्ग काढण्यासाठी आपल्या बरोबर असतो. प्रभूचा शब्द आपण आता मन लावून ऐकू या ः

**शास्त्रवाचन ः** मत्तय ११ ः २७ - ३०

## चिंतन

आपले संपूर्ण लक्ष प्रभू येशू ख्रिस्तामध्ये केंद्रित करू या. ख्रिस्त म्हणतो, अहो दुःखी कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हाला विसावा देईन. प्रभू येशूच्या या स्वर्गीय वचनावर विसंबून आपल्या मनावरील दडपण, ताणतणाव, कुटुंबातील अडचणी, अभ्यासातील व व्यवसायातील अपयश, एकमेकांमधील गैरसमज, आपल्या जीवनातील पापांचा अंधःकार, मोहांचा विळखा, आपला अशक्तपणा, दुर्बळपणा, जीवनातील सर्व विकृतीचे ओझे या सर्व गोष्टी आपण ख्रिस्ताला सांगून आपले मन हलके करू या.

*शांतता*

**गायन ः** मुक्ती देई येशू नाम ..... (वसुंधरे गा - गीत क्र ११५)

*शांतता*

होय, ख्रिस्त शांतीदाता व मुक्तीदाता आहे. त्याने आपल्याला अनेक गोष्टीपासून मुक्त केले आहे व पुढेदेखील मुक्त करून तो आपल्याला शांती देणार आहे. फक्त आपण त्याच्याकडे जायला हवे व आपले मन, अंतःकरण मोकळे करायला हवे.

## आभार

प्रभूला आपल्या आभार स्तवनाची गरज नाही. परंतु प्रभूचे आभार स्तवन करण्याची इच्छा आपल्या मनात निर्माण झाली हे प्रभूचे आपल्याला लाभत असलेले मोठे वरदान आहे. आपल्या आभार स्तवनाने पभूच्या मोठेपणात काही भर पडत नाही. उलट आमच्या प्रभूयेशू ख्रिस्ताद्वारे त्याच्या कृपेत वाढण्यास आपल्याला सहाय्य होते. प्रभूकडून आपल्याला मिळत असलेल्या सर्व कृपादानांबद्दल आपण मनापासून देव पित्याचे, देव पुत्राचे व पवित्र आत्म्याचे आभार मानू या, धन्यवाद देऊ या.

*शांतता*

आता आपण आपल्या विनंत्या प्रभूचरणी सादर करू या .

श्रद्धावंताच्या प्रार्थना

प्रतिसाद ः ऐक प्रार्थना प्रभू देवा

१ . आपल्या सर्व धार्मिक नेत्यांना आपल्या आचरणाद्वारे व प्रभूशब्दाद्वारे प्रभूची साक्ष देण्यासाठी पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन व चांगले आरोग्य लाभावे म्हणून आपण प्रभूजवळ प्रार्थना करू या .

२ . आपल्या राज्यकर्त्यांनी स्वतःचा स्वार्थ बाजुला सारून देशाचा कारभार पाहावा व सामान्य जनतेच्या हिताकडे विशेष लक्ष द्यावे म्हणून आपण प्रभूजवळ प्रार्थना करू या .

३ . जो विश्वास आपल्याला स्नानसंस्कारातून मिळालेला आहे तो वाढविण्यासाठी आपण इतर संस्काराचा चांगला पाठपुरावा करावा, रोझरीच्या कौटुंबिक प्रार्थनेद्वारे व पभू शब्दाद्वारे आपण प्रभूच्या व पवित्र मरियेच्या जवळ राहावे म्हणून आपण पभूजवळ प्रार्थना करू या .

४ . आजारी, दुःखी, विकलांग ह्यांची सेवा आपल्याकडून घडावी व त्यांना प्रभूचा जवळून स्पर्श व्हावा, आपल्याही ईश्वराने आरोग्याची देणगी द्यावी म्हणून आपण प्रभूजवळ प्रार्थना करू या .

५ . अति उष्णतेपासून आपला प्रभूने सांभाळ करावा, पावसाळया अगोदरची कामे आपल्याकडून पूर्ण व्हावीत, यंदा पाऊस वेळेवर व भरपूर मिळावा तसेच आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूसाठी आपण प्रभूजवळ पार्थना करू या .

साकामेंताची पार्थना व आशीर्वाद

अंतिम गीत ः ख्रिस्तराज्याची सुवार्ता ..... (वसुंधरे गा - गीत क : १६२)